# वसई-विरार शहर महानगरपालिका
## घनकचरा व्यवस्थापन विभाग

दि.१९/०४/२०२४

## वसई विरार मधील नालेसफाईला सुरुवात
## नालेसफाईसाठी महापालिकेचे विशेष नियोजन

वसई विरार शहर महानगरपालिकेतर्फे शहरातील नालेसफाईला सुरवात करण्यात आली असून ३१ मे पर्यंत हे काम पूर्ण केले जाणार आहे. नालेसफाईच्या कामासाठी प्रत्येक प्रभागात विशेष नियोजन करण्यात आले असून काम योग्यरित्या व्हावे यासाठी प्रत्येक प्रभागानुसार सहाय्यक आयुक्तांपासून अतिरिक्त आयुक्त पर्यवेक्षण करणार आहे.

वसई विरार शहरात १८० किलोमीटर लांबीचे दिडशेहून अधिक नाले आहेत. त्यामध्ये प्रभाग समिती 'ए' ( २९) प्रभाग समिती 'बी' (१२) प्रभाग समिती 'सी' (२९) प्रभाग समिती 'डी' (८) प्रभाग समिती 'ई' (१७) प्रभाग समिती 'एफ' (४३) प्रभाग समिती 'जी' (५१) प्रभाग समिती 'एच' (१०) आणि प्रभाग समिती 'आय' (१६) नाल्यांचा समावेश आहे. पालिकेतर्फे पावसाळ्यांपूर्वी या नाल्याची साफसफाई केली जाते. यंदा देखील पालिकेने नालेसफाई व्यापक आणि परिणामकारकरित्या व्हावी यासाठी विशेष नियोजन केले आहे. १५ एप्रिल पासून या नाल्यांच्या साफसफाईचे काम हाती घेण्यात आले आहे. या सर्व ९ प्रभागात एकाच वेळेस नालेसफाईचे काम केले जाणार आहे. पालिकेने नालेसफाईसाठी विशेष यंत्रणा तयार केली आहे. यासाठी १७ लॉंग बूम, ४७ शॉर्ट बूम, २५ जेसीबी, ३९ डंपर आणि २ तराफांचा वापर केला जाणार आहे. नाल्यातील काढलेला गाळ पुन्हा नाल्यात जाऊ नये यासाठी तो महापालिकेने निश्चित केलेल्या मोकळ्या जागेत टाकला जाणार आहे. यासाठी डंपरचा वापर करण्यात येणार आहे. या संपूर्ण नालेसफाईच्या कामाचे नियोजन उपायुक्त नानासाहेब कामठे (घनकचरा व्यवस्थापन) यांच्यामार्फत करण्यात येत आहे.

### नालेसफाईच्या कामावर अधिकाऱ्यांचे देखरेख

नालेसफाईचे काम योग्यरित्या व्हावे यासाठी यंदा पालिकेने विशेष खबरदारी घेतली आहे. प्रत्येक कामाचे जीओ टॅगिग छायाचित्रे काढले जाणार आहे. ठेकेदारामार्फत नाल्यांची साफसफाई केली जाणार असली तरी दैनंदिन नालेसफाईच्या कामावर प्रत्येक प्रभागनिहाय उपअभियंता, सहाय्यक आयुक्त, उपायुक्त आणि अतिरिक्त आयुक्तांमार्फत पर्यवेक्षण केले जाणार आहे. प्रत्येक अधिकाऱ्यांना देखरेखीसाठी नाले विभागून देण्यात आले आहेत. या नियोजनामुळे नालेसफाई योग्यरित्या केली जाईल, असा विश्वास मा.आयुक्त अनिलकुमार पवार यांनी व्यक्त केला आहे. ३१ मे पर्यंत शहरातील सर्व प्रमुख नाल्यांची साफसफाई पूर्ण केली जाणार आहे, असेही आयुक्तांनी सांगितले.

**घनकचरा व्यवस्थापन विभाग**
**वसई विरार शहर महानगरपालिका**